**मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या प्रस्तावित अहमदनगर-सोलापुर-अक्कलकोट सहापदरी द्रुतगती महामार्ग महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील सारोळा बद्दी साखळी क्र.२९०.००० कि. मी. या गावापासुन सुरुवात व शेवट सोलापुर जिल्ह्यातील उमरगे या गावाजवळ साखळी क्र.५२४.५०० कि.मी. NH-150C वर समाप्त होतो. (२९०.००० कि.मी. ते ३०६.६०० कि. मी. (नगर तालुका) व ३४४.४४ कि. मी. ते ३६९.००० कि.मी. (जामखेड तालुका) पर्यंतच्या रस्त्यासाठी एकूण ४० कि. मी. नगर व जामखेड तालुका, जि. अहमदनगर मधून जातो) बाबत दिनांक २८/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. समाधान लॉन्स, सांस्कृतिक भवन व मंगल कार्यालय, मु.पो. चिचोंडी पाटील, नगर- जामखेड रोड, सांडवा फाटा, ता. नगर, जि. अहमदनगर येथे घेण्यात आलेल्या पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणीचे इतिवृत्त :-**

---

मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या प्रस्तावित अहमदनगर-सोलापुर-अक्कलकोट सहापदरी द्रुतगती महामार्ग महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील सारोळा बद्दी साखळी क्र.२९०.००० कि. मी. या गावापासुन सुरुवात व शेवट सोलापुर जिल्ह्यातील उमरगे या गावाजवळ साखळी क्र.५२४.५०० कि.मी. NH-150C वर समाप्त होतो. (२९०.००० कि.मी. ते ३०६.६०० कि. मी. (नगर तालुका) व ३४४.४४ कि. मी. ते ३६९.००० कि.मी. (जामखेड तालुका) पर्यंतच्या रस्त्यासाठी एकूण ४० कि. मी. नगर व जामखेड तालुका, जि. अहमदनगर मधून जातो) बाबत दिनांक २८/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. समाधान लॉन्स, सांस्कृतिक भवन व मंगल कार्यालय, मु.पो. चिचोंडी पाटील, नगर- जामखेड रोड, सांडवा फाटा, ता. नगर, जि. अहमदनगर येथे पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी घेण्यात आली होती.

मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-११८/२०२४. पत्र क्रं. बी.ओ. / जे.डी.(डब्ल्यूपीसी) / पीएच / बी- २४०२१३- एफटीएस-०१५१ दि. १३/०२/२०२४ अन्वये, पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी समिती गठीत करण्यात येऊन खालीलप्रमाणे समितीचे सदस्य सदर लोकसुनावणीस उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) जिल्हादंडाधिकारी, अहमदनगर,<br>किंवा त्यांचे प्रतिनिधी<br>(अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा<br>कमी दर्जाचा नसावा) | - **अध्यक्ष** |
| २) प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, नाशिक<br>(महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी) | - **सदस्य** |
| ३) उप प्रादेशिक अधिकारी,<br>महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,<br>अहमदनगर | - **संयोजक** |

श्री. चंद्रकांत न. शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, अहमदनगर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समितीचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सदर जाहीर लोकसुनावणीची कार्यवाही सुरु केली. सर्वप्रथम महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे आजूबाजूच्या गावातील उपस्थित सर्व नागरिकांचे स्वागत करण्यात आले. त्यांनी सांगितले की, आज आपण महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांच्या प्रस्तावित अहमदनगर-सोलापुर-अक्कलकोट सहापदरी द्रुतगती महामार्ग महाराष्ट्र राज्यातील अहमदनगर जिल्ह्यातील सारोळा बद्दी साखळी क्र. २९०.००० कि. मी. या गावापासुन सुरुवात व शेवट सोलापुर जिल्ह्यातील उमरगे या गावाजवळ साखळी क्र. ५२४.५०० कि.मी. NH-150C वर समाप्त होतो. (२९०.००० कि.मी. ते ३०६.६०० कि. मी. (नगर तालुका) व ३४४.४४ कि. मी. ते ३६९.००० कि.मी. (जामखेड तालुका) पर्यंतच्या रस्त्यासाठी एकूण ४० कि. मी. नगर व जामखेड तालुका, जि. अहमदनगर मधून जातो) बाबत पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी घेण्यासाठी जमलो आहोत. सदर प्रकल्प हा पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकारचे अधिनियम दिनांक १४ सप्टेंबर, २००६ च्या अधिसूचनेनुसार 'अ' वर्गात मोडतो. ज्यास भारत सरकार, नवी दिल्ली यांची पर्यावरण विषयक मंजुरी घ्यावी लागते, त्याचाच एक भाग म्हणून सदर प्रकल्पासाठी जाहीर लोक सूनावणी घेणे आवश्यक आहे. मे. भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण (NHAI) यांचा पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी घेण्यासाठी म.प्र.नि. मंडळाकडे अर्ज दि.०४/१०/२०२३ रोजी प्राप्त झाला. त्या अनूषंगाने मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांच्या परवानगीने आजची लोकसूनावणी दिं. २८/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. निश्चित करण्यात आली. पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी बाबत नियमानूसार ३० दिवस अगोदर दि. २४/०१/२०२४ रोजी दैनिक सकाळ व दैनिक टाईम्स ऑफ इंडिया या वृत्तपत्रामध्ये जाहीर सूचना प्रसिध्द करण्यात आली. तसेच जिल्ह्यातील संबंधित शासकीय कार्यालये व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या संकेतस्थळावर सदरच्या प्रकल्पाची माहिती पुस्तिका नागरिकांच्या अभ्यास व अवलोकनाकरीता ठेवण्यात आलेल्या होत्या, त्याची यादी खालील प्रमाणे-

१. जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर.
२. जिल्हा परिषद, अहमदनगर.
३. जिल्हा उद्योग केंद्र, अहमदनगर.

४. उप विभागीय कार्यालय, नगर-नेवासा, कर्जत-जामखेड, जि. अहमदनगर
५. तहसिल कार्यालय, नगर व जामखेड, जि. अहमदनगर.
६. ग्रामपंचायत कार्यालय, सारोळा बद्दी, कोल्हेवाडी, मदडगांव, दशमी गव्हाण, भातोडी पारगांव, चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर.
७. ग्रामपंचायत कार्यालय, डोनगांव, अरणगांव ,खामगांव वंजारवाडी (धानोरा), फक्राबाद, दिसलेवाडी, खांडवी, बावी, राजेवाडी, नान्नज, चोबेवाडी, पोटेवाडी, ता. जामखेड, जि .अहमदनगर.
८. उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, अहमदनगर.
९. प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि.मंडळ, नाशिक.
१०. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुख्यालय, कल्पतरू पॉईन्ट, ३ रा माळा, सायन माटूंगा स्कीम रोड नं.८, सायन सर्कल समोर, सायन (पूर्व), मुंबई-२२.
११. पर्यावरण विभाग, नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.

तसेच त्यांनी नमुद केले की, याबाबत काही सूचना/आक्षेप असल्यास याबाबत कळवण्यासाठी ३० दिवसाची मूदत देण्यात आलेली होती त्या अनुषंगाने उप प्रादेशिक कार्यालय, म.प्र.नि. मंडळ, अहमदनगर येथे एकही सूचना/आक्षेप लेखी स्वरूपात आजपर्यंत प्राप्त झालेले नाहीत. तसेच त्यांनी उपस्थित नागरिकांना विनंती केली की, अजूनही आपले काही आक्षेप/टिका/टिप्पणी असतील तर ते आपण प्रकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर विचारावेत. तदनंतर त्यांनी, सदर प्रकल्प प्रवर्तकांना प्रस्तावित प्रकल्पाविषयीचे सादरीकरण करण्याविषयी विनंती केली.

श्री. डी. एस. झोडगे, प्रकल्प संचालक व श्री. केतन गावंडे प्रकल्प सल्लागार, मे. आरवी असोसिएटस आरकीटेकस इंजिनीयर्स आणि कन्सलटंट प्रा.लि., हैद्राबाद यांचे प्रतिनीधी यांनी प्रकल्पाबद्दल विविध मुदयांवर सादरीकरण केले जसे की, पर्यावरण प्रभाव मुल्यांकन आणि जाहीर जनसुनावणीचे प्रयोजन, प्रकल्पाचा तपशिल, प्रकल्पाचा आराखडा, पर्यावरण सदयस्थितीचा अभ्यास, स्थानीक पर्यावरणाचा तपशील व परिसराची माहिती, अभ्यास स्थळाची माहिती, अध्ययन क्षेत्रातील हवेचा दर्जा, अध्ययन क्षेत्रातील ध्वनीची तीव्रता, अध्ययन क्षेत्रातील पाण्याची गुणवत्ता, अध्ययन क्षेत्रातील मातीची गुणवत्ता, जैव पर्यावरण, सामाजिक आर्थीक पर्यावरण, सभोवतालच्या पर्यावरणावर होणारे अपेक्षित परिणाम, पर्यावरण व्यवस्थापन आराखडा, विविध पर्यावरण विषयक परिणामांच्या उपाय योजना, पर्यावरण जबाबदारी योजने अंतर्गत सामाजिक-

आर्थीक कल्याण उपक्रम, पर्यावरण व्यवस्थापन खर्चाची तरतूद, प्रकल्पाचे फायदे इत्यादी. सदर माहिती सीडीमध्ये रेकॉर्डींग करण्यात आली असून संक्षिप्तमध्ये इतिवृत्तात नोंद करण्यात आली आहे.

प्रकल्प सल्लागारांनी सदर प्रकल्पाचे पॉवर पॉईंट सादरीकरण समाप्त केल्यानंतर श्री. चंद्रकांत न. शिंदे यांनी सांगितले की, सदर पर्यावरण विषयक जाहीर लोकसूनावणी ही पर्यावरण विषयक आहे त्यामूळे उपस्थित नागरिकांनी त्यांचे जे काही प्रश्न आक्षेप/टिका/टिप्पणी असतील ते केवळ पर्यावरण विषयक विचारावेत.

त्यानंतर प्रस्तावित प्रकल्पाबाबत खालील प्रमाणे सूचना/हरकती/आक्षेप इत्यादी प्राप्त झाले. त्याचे प्रकल्पा व्यवस्थापकाच्या वतीने त्यांचे सल्लागार/प्रतिनीधी यांनी दिलेले उत्तर/आश्वासन खालील प्रमाणे आहेत.

| **अ. क्रं.** | **केलेले टिका टिप्पणी, आक्षेप, सुचना मुददा इत्यादी व उपस्थित व्यक्तिचे नांव.** | **उदयोगाच्या प्रतिनिधीने/ प्रकल्प सल्लागार यांनी दिलेले आश्वासन / उत्तर.** |
|---|---|---|
| १) | **श्री. साहेबराव छबुराव शेडाळे, सरपंच, मदडगांव, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी सांगीतले की हा प्रकल्प अतिशय उत्कृष्ठ आहे. तसेच प्रकल्पाचे नियोजन देखील खुप सुंदर आहे. रस्त्याचे काम सुरु झाल्यानंतर जमीनीवर, शेती पिकांवर व फळबागेंवर परिणाम होणार आहे. त्यामुळे आपल्या मार्फत करणार असलेल्या उपाय योजनांच्या व्यतिरिक्त आणखी जास्तीत जास्त उपाय योजना करण्यात याव्यात असे आम्ही सर्व शेतकऱ्यांच्या वतीने आपणास विनंती करतो. | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी असे सांगीतले की, शासनाने मंजुर केलेल्या पर्यावरणीय अनुमतीपत्रातील अटी व शर्तीचे संपुर्णपणे पालन करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २) | **नागरीक ग्रामपंचायत सदस्य, चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, सदरील काम चालु असताना होणाऱ्या ध्वनीमुळे त्या ठिकाणी राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या/ नागरिकांच्या व वन्य प्राण्यांच्या आरोग्यावर नक्कीच मोठया प्रमाणात परिणाम होणार आहे. तसेच अनेक शेतकऱ्यांचे पोल्ट्री उद्योगांवर परिणाम होणार आहेत. वरील मुद्दयांबाबत उपाययोजना व नुकसानीच्या मोबदल्याबाबत माहिती देण्यात यावी. | **यावर प्रकल्प संचालक,** ज्या ज्या ठिकाणी लोकवस्ती असेल आणि तेथे काम करताना तेथे तीन वेळेस पाणी मारणार आहेत. त्यामुळे धुळ कमीतकमी उडेल. आणि जर पोल्ट्री उद्योग त्या ठिकाणी असेल तर त्या ठिकाणी ग्रीन कपडा वगैरे लावण्यासाठी आम्ही कॉट्रॅक्टरलाच त्या टेंडरमध्ये अटी व शर्ती टाकुन देऊ. आणि शेतीच्या प्रश्नाबाबत ज्या ज्या ठिकाणी वहिवाटीच्या वाटा आहेत, शिवार रस्ते आहेत त्या ठिकाणी आम्ही तसे पि.यु.पि., दिलेले आहेत. तसेच सर्व्हीस रोड सुध्दा ३३ टक्के दिलेले आहेत. |
| ३) | **रामदास जाधव, रा. चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, आम्हा शेतक-यांना ज्या तलावातुन पाणी येते तो तलाव बाधीत होणार आहे. (रस्त्यामध्ये जाणार आहे.) त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. जर तलाव गेला तर आमच्या पाण्याची सोय कोठुण होणार? | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, ज्या ठिकाणचा मुरुम उचलणार आहोत तेथे आपण अमृत सरोवर तयार करणार आहोत. जेथे छोटे ब्रिजेस/पुल आहेत तेथे आपण गेट लावुन पाणी अडवणार आहोत. त्यामुळे आजुबाजुच्या जमीनीमध्ये पाण्याची पातळी वाढणार आहे. |
| ४) | **श्री. लहु रामदास जाधव, रा. चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, सदरील प्रकल्पामध्ये आमची विहीर सुध्दा जाते तसेच कंन्स्ट्रक्शन चालु असताना ध्वनी प्रदुषण होणार आहे त्याबाबत काय उपाययोजना करणार आहात? तसेच गावातील शिक्षित नागरिकांना या प्रकल्पामध्ये रोजगार मिळावा अशी शाश्वती सरकारने दयावी अशी त्यांनी विनंती केली. तसेच | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, झाडे किंवा विहीरी असतील तर त्यासाठी भुसंपादन विभाग हे सर्व ठरवतात व त्यांनाच ते अधिकार असतात व जिल्ह्यातील तज्ञांमार्फत सर्व मुल्यांकन NH Act १९५६ जो अधिनियम अन्वये परिगणित करण्यात येणार आहे. तसेच नैसर्गीक नाले किंवा पाणी हे कोठेही अडविले जाणार नाही. त्याचे ड्रेनेज |

Shinde

Repaid

| | | |
|---|---|---|
| | माझी साहेबांना विनंती आहे की, ज्यांचे झाडे किंवा विहीरी जातात याबाबतचे मुल्यांकन कसे होणार आहे याबाबत माहिती देण्यात यावी. | प्लॅन वगैरे पुर्वी मान्यता घेऊन तसेच ग्रामपंचायतीशी चर्चा करुन मान्यता घेतलेली आहे. |
| ५) | **नागरिक रा. चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, सदरील रस्ता हा आमच्या शेताच्या लगत आहे. व त्यामुळे रस्त्याचे पाणी आमच्या शेतामध्ये उतरेल आपण पाणी वाहण्यासाठी जागा दिलेली आहे का? | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, सदरील रस्ता हा ६० मीटर आहे. त्यामुळे पुर्ण ६० मीटर मध्ये रस्त्याचे बांधकाम होणार नाही. परंतु रस्त्याच्या दोन्ही बाजुने ३० ते ४० फुट जागा ही मोकळी सोडली जाते. व जे रोडवरील पाणी असते ते शेजारील नाल्यामध्ये जोडले जाते. |
| ६) | **श्री. कासुमिया सय्यद, माजी उपसरपंच, रा. चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी सांगीतले की, माझी कलेक्टर साहेबांना विनंती आहे की, कृषि विभाग, बांधकाम विभाग, वन विभाग हे सर्व डिपार्टमेंटचे लोक आले होते त्यावेळेस त्यांनी सर्व्हे केला सर्व्हेमध्ये त्यांनी २५ ते ३० वर्षांचे असणाऱ्या झाडांना बिल्ले मारली परंतु माझे १२५ फळझाडे आहेत परंतु त्याठिकाणी एकाही फळ झाडाची नोंद घेतलेली नाही. परंतु फक्त बाभळ, बोर व लिंबाची झाडांची नोंद घेतलेली आहे. तसेच काही लोकांची २ ते ४ वर्षांची झाडे आहेत त्यांची नोंद घेतलेली आहे. त्याबाबत मी लेखी अर्ज जिल्हाधिकारी कार्यालय तसेच बांधकाम विभागास दिलेले आहे. परंतु | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, जर झाडे रस्त्यामध्ये जात असतील त्याची नोंद घेणार आहेत. तसेच हा विषय हा भुसंपादन विभागाशी संबंधीत आहे. तुम्ही त्यांना लेखी तक्रारी द्याव्यात. |

| | | |
|---|---|---|
| | त्याबाबत आम्हाला कोणतीही सुचना किंवा लेखी उत्तर मिळालेले नाही. | |
| ७) | **नागरीक, चिचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी सांगीतले की, माझे २० वर्षांचे जुने झाडे आहेत परंतु त्या झाडांची नोंद लागलेली नाही. परंतु शेजारी फक्त १ महिन्यांचे झाडांची नोंद लागलेली आहे. तसेच ज्याचे आगोदर बोअर नव्हते त्याचे बोअरची नोंद लागलेली आहे. तसेच ज्यांच्या पाईपलाईन नव्हत्या त्यांची नोंद लागलेली आहे. परंतु माझे सर्व असताना देखील माझ्या विहीर, बोअर, पाईपलाईन तसेच झाडांची नोंद लागलेली नाही. | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, तुम्ही तुमच्याकडे असलेल्या सर्व विहीर, बोअर, पाईपलाईन तसेच झाडांचे फोटोग्राफ तसेच व्हीडीओ शुटींग काढुन ठेवा नंतर तुम्हाला त्याचा फायदा होणार आहे. |
| | **मा. अध्यक्ष** पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगीतले की पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी बैठकीत उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरण विषयक सूचना, आक्षेप, टिका टिप्पणी असल्यास ते उपस्थित करण्याची संधी दिली. त्यांनी उपस्थितांना टिका टिपण्णी, सूचना किंवा आक्षेप नांदविण्याचे आवाहन केले. तसेच नागरिकांनी भुसंपादनाबाबतचे मुद्दे भुसंपादन विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर यांच्याकडे लेखी स्वरुपात दाखल करावेत. | |
| ८) | **श्री. वैभव आबासाहेब कोकाटे, रा. चिंचोंडी पाटील, ता.नगर, जि. अहमदनगर** हे म्हणाले की, सुरत-चेन्नई रस्त्यालगतच आमची 4 मीटर अंतरावर विहीर आहे. त्या विहीरीचे पाणी जाऊ शकते, त्याबाबत आपण उपाययोजना करणार आहात? | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, मी ग्रामपंचायत कार्यालयाला देखील विनंती करेल की, आपला भाग हा पाण्याच्या दृष्टीने दुष्काळी भाग आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणचा मुरुम उचलणार आहोत तेथे आपण अमृत सरोवर तयार करणार आहोत तेथे पाणी साठणार व त्या ठिकाणी मुरले |

| | | |
|---|---|---|
| | | जाणार आहे. त्यामुळे तुमचे पाणी कमी होणार नाही. याउलट तुमचे पाणी वाढणार आहे. तसेच तुम्ही फोटोज व व्हीडीओ शुटींग काढुन ठेवा तुम्हाला तुमचा मोबदला मिळणार आहे. |
| ९) | **श्री. कोकाटे रा. चिंचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, माझ्या शेतात जी पाईपलाईन आहे, ती नंतर टाकता येईल का? रस्त्यामध्ये मंदिर जाणार आहे. त्यासाठी आपण काय करणार आहात. | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, तुम्हाला नवीन पाईपलाईन टाकायच्या असल्या तर आपण ठिक ठिकाणी ५०० मीटर अंतरावर पाईप जोडणीसाठी कनेक्शन देणार आहोत. त्या ठिकाणी तुम्हाला मंदिर बांधुन देण्यात येईल. |
| १०) | **नागरिक रा. चिंचोंडी पाटील, ता. नगर, जि. अहमदनगर** यांनी विचारले की, सदर प्रकल्पामध्ये शेतक-यांचे काही एकर जमिनी गेल्या आहेत व त्यामधून काही गुंठा जमिनी शिल्लक राहताय, या जमिनीचा शेतक-यांना काहीच फायदा होणार नाही त्यांचे यामध्ये नुकसानच आहे. त्यामूळे प्रकल्प धारकांनी या शिल्लक राहीलेल्या जमिनीसूध्दा विकत घ्याव्यात जेणेकरून शेतक-यांना काहींसा फायदा होईल. तसेच रस्त्याच्या बाजूस होणारे सर्व्हिस रोड कशा प्रकारे राहतील याबदल मार्गदर्शन करावे. | **यावर प्रकल्प संचालक,** यांनी सांगितले की, सदर प्रकल्पामध्ये ज्या शेतक-यांच्या 4 किंवा 5 गुंठा अशा जमिनी शिल्लक राहतात यासाठी कूठलीही तरतूद किंवा धोरण आखलेले नाही. परंतु ज्या शेतक-यांचे नूकसान होत आहे त्या शेतक-यांनी महसूल विभागामध्ये सदर बाबींबाबत अर्ज करावा, तसेच सर्व्हिस रोड बददल त्यांनी सांगितले की, एक्सप्रेस हायवेच्या बाजूला सर्व्हिस रोड नसतात. |

श्री. चंद्रकांत न. शिंदे, उप प्रादेशिक अधिकारी, अहमदनगर यांनी सांतिले की सदर जनसुनावणी दरम्यान २४ लेखी निवेदने प्राप्त झालेली आहेत.

Shinde

Bepatil

श्री. राजेंद्रकुमार पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी, अहमदनगर तथा अध्यक्ष पर्यावरण विषयक जाहीर लोक सुनावणी समिती यांनी उपस्थितांना संबोधित केले की, आपण उपस्थित केलेल्या प्रश्नांची नोंद घेण्यात आलेली आहे. शेवटी त्यांनी उपस्थित सहभागींचे आभार मानून प्रस्तावित प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहीर लोक सूनावणी समाप्त झाली असे जाहीर केले.

(चंद्रकांत शिंदे)
संयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
अहमदनगर

(लिंबाजी भड)
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी,
मप्रनि मंडळ,
नाशिक

(राजेंद्रकुमार पाटील)
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
निवासी उप जिल्हाधिकारी,
अहमदनगर.